स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. मानव्य विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन विषय

“हिंगोली जिल्ह्यातील बंजारा समाजाचा आर्थिक व सामाजिक जीवनाचा ऐतिहासिक अभ्यास”

:: संशोधक विद्यार्थी ::

यशदिप शंकरराव राठोड
(एम.ए.इतिहास)

:: संशोधक मार्गदर्शक ::

प्रा.डॉ.जी.पी.भालेराव
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव
ता.सेनगांव जि.हिंगोली

:: संशोधन केंद्र ::
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल
1	विषय प्रवेश
2	संशोधनाचे महत्व
3	संशोधनाची उद्दिष्ट्ये
4	संशोधनाची गृहितके
5	संशोधन पध्दती
6	संशोधनाची आवश्यकता
7	संशोधनाची व्याप्ती
8	प्रकरण विभागणी
9	संदर्भ ग्रंथ सूची

विषय प्रवेश

भटक्या विमुक्त जमाती अस्थिर असल्यातरी फार प्राचीन काळापासून त्या भारतीय हिंदू परंपरेचा व संस्कृतीचा वारसा घेऊन आपले जीवन कंठत होत्या. याचा दुसरा महत्वाचा दुवा म्हणजे त्यांच्यामध्ये चालू असलेल्या सामाजिक परंपरा होय. डोक्यावर शिरखाण घालून फिरणा-यान नमन केले आहे. ज्याना बजारी म्हणून संबोधले जाते. त्यांच्यात डोक्याला शिंगे बाधून फिरण्याची प्रथा असल्याचे दिसते त्यांच्याकडे संकेत करते (शुक्ल यजुर्वेद १६:२२) निषाद आणि पती याचा उल्लेखही त्यावेळी असलेल्या विमुक्त जमातींकडे निर्देश करतो.

प्राचीन महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी असलेल्या या भूभागास 'मराठवाडा' ही भौगोलिक संज्ञा प्राप्त होणे ही योगायोगाची ऐतिहासिक निष्पती आहे. या शब्दाचे 'मराठे' हे पूर्वपद महाराष्ट्र या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट रूप असून त्याचे उपपद 'वाडा' हे 'वाटक' या संस्कृत शब्दाचे रूप होय. 'वाडा' / 'वाडी' ही उप्पड़े प्राचीन काळी दक्षिणेत प्रांतिक प्रशासकीय विभागासाठी लावलेली आढळतात.

आज भटके आणि विमुक्त समजले जाणारे समाज बृहत्तर हिंदू समाज जीवनाचे अविभाज्य अंग होते. प्रत्येक समाजात वेगवेगळेपण होते त्यांचा उपयोग स्थिर समाजाला होत असे त्यांच्या कामाचा मोबदलाही त्यांना मिळत असल्याने ही देवाणघेवाण शेकडो वर्षे सुरु होती. प्रत्येकाची जात, जमात वेगळी होती आजच्या वर्गीकरणाप्रमाणे महाराष्ट्रात भटके-विमुक्त समाज वर्गात येणाऱ्या समाजामध्ये बंजारा, बेरड, कंजारभट, कैकाडी, मांग, गारूडी, पारधी, भामटा, माकडवाले, गोपाळ, चित्रकथी, जोशी, धनगर, वडार, असे अंतर्भूत होतात.

भटक्या आणि विमुक्त जमातीचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे सतत बदलत राहणारे निवासस्थान होय आणि यावरून त्यांचे वर्गीकरण निश्चित करण्यात आले आहे. या जमाती शेकडो वर्ष फिरत्या राहिल्या आहेत. भटकंती करताना त्यांनी काही उद्योग आत्मसात केले आहेत त्यांच्या ह्या विशेष उद्योगाचे गावगाडा ओढण्यात महत्वाचे योगदान होते. त्यांचे ढोबळमानाने दोन भागांत वर्गीकरण होते.

१) उत्पादन आणि पर्यावरण जतनाचे काम करणारे जनसमूह

२) रंजक आणि कलाकौशल्याचा उपयोग करून उपजीविका करणारे जनसमूह

उत्पादन आणि पर्यावरणीय संतुलन राखण्याच्या कक्षेत येणारा समाज बजारा किंवा लमाण, बेरड, पारधी, छप्परबंध इत्यादी आहेत. बंजारा / लमाण या समाजाचे महत्वाचे काम म्हणजे धान्य, दैनंदिन खाण्याच्या वस्तू आणि दारुगोळा ह्यांची दूरवर ने आण करण्याचे असे पूर्वीच्या काळी मोहिमेवर निघालेल्या सैन्याला रसद पुरवठा करण्याचे महत्त्वाचे काम हे बंजारा जनसमूह करत असत त्यांचे तांडे बैलावर धान्य लादून आपल्या परिवारांसह प्रवास करत असत, बजारा समाजाच्या सहकार्याशिवाय कुठल्याही सैन्याची मोहीम फत्ते होणे शक्यच नसे. राज्यव्यवस्थेत सैन्याच्या देशांतर्गत मोहिमाच लयाला गेल्या.

रेल्वेसारखी दळणवळणाची साधने आल्याने बंजारा जमातींचे शेकडो वर्ष चालू असलेले धान्य, दारुगोळा इत्यादींची वाहतूक करण्याचे काम ठप्प झाले. एकेकाळी फिरतीवर राहणारे हजारो बैल आणि जनावरे बाळगणारे लोक स्थिर होताना मात्र आपली आर्थिक स्वतंत्रता गमावून बसले. असाच प्रकार पारधी, बेरड, रामोशी इत्यादी समाजाच्या बाबतीत घडला. गेल्या शेकडो वर्षाच्या काळात उत्तरेकडून येऊन महाराष्ट्रात स्थिर सलेल्या समाजामध्ये बजारा, लमाण /लंबाडी, छप्परबंद, कंजारभाट इत्यादी जमातींचा समावेश होतो तर बेरड, रामोशी, बहार, कट, कैकाडी इत्यादी दक्षिणेतून आलेल्या जमातींचा समावेश या सर्व समाजाची स्वतःची अशी सांस्कृतिक ओळख भारतीय परंपरेशी जुळलेली आढळते. प्रत्येक जमात कोणत्या ना कोणत्या स्वरुपात स्वतःला प्राचीन परंपरेशी जोडलेली दिसते लमाण स्वतःला वाली आणि सुग्रीव यांचे वंशज मानतात. भटके विमुक्त समाज हे वेदकाळापासून भारतात अस्तित्वात होते आणि त्याचे वन्य प्रदेशात वास्तव्य होते.

महाराष्ट्र शासनाने ज्या समाजाची वर्गवारी भटके विमुक्त समाज अशी केली आहे, त्यात अनेक जाती, जमाती आदी समूहांचा समावेश होतो. ह्या छोट्या

जनसमूहांची संख्या बरीच्या बाबतीत काही हजारांत मोडत असली तरी त्या समूहांनी आपली सांस्कृतिक वैशिष्टे जपून आपले वेगळेपण जोपासले आहे.

सदरील संशोधन कार्यात हिंगोली जिल्ह्यातील बंजारा समाजाचा सखोल अभ्यास करावयाचा आहे. आज स्थानिक इतिहासाला कमालीचे महत्व प्राप्त झालेले असून उपरोक्त समाजाच्या परंपरा व संस्कृतीचे अध्ययन करणे सेनगाव व कळमनुरी तालुक्यामध्ये ताड्यांची संख्या खूप आहे. प्रत्यक्ष भेटून खरा इतिहास 'जाणून घेण्यासाठी उपक्रम हाती घेतलेला आहे संशोधन कार्यातून समाजाला ज्याला न्याय देण्याची माझी भूमिका असून त्यात मी यशस्वी होईल.

२. संशोधनाचे महत्व

१. हिंगोली जिल्ह्यास ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने फार मोठा वारसा प्राप्त झालेला आहे. बंजारा समाज हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी, सेनगाव व ओटा (नागनाथ) तालुक्यात सर्वाधिक संख्येने पहायला मिळतो.

२. बंजारा समाजातील प्रमुख पवित्र स्थळाचा अभ्यास करणे जसे की लमाणदेव ता. कळमनुरी व कापडसिंगी ता. सेनगाव यांचा अभ्यास करणे.

३. उपरोक्त दोन्ही ठिकाणी दरवर्षी अनेक सण, वार्षिक उत्सव साजरे केले जातात, त्यामागील समाज बांधवाची भूमिका जाणून घेणे गरजेचे आहे.

४. प्राचीन काळापासून उपरोक्त समाज हा कष्टाळू असून भारतात राज्य प्राप्त केलेल्या सर्वच संस्थानिकांना मदत करण्याचे काम बंजारा समाजाने केले. रसद पुरवठा व दारुगोळा योग्य ठिकाणी पोहोचविणे ही कामे केली.

३. संशोधनाची उद्दिष्टे :

१. हिंगोली जिल्ह्यातील बंजारा समाजाचा ऐतिहासिक अभ्यास करणे.

२. बंजारा समाजाची पूर्वापार चालत आलेली संस्कृती जाणून घेणे.

३. बंजारा समाजाचे जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे.

४. उपरोक्त स्थळांमध्ये होणारे वार्षिक उत्सवाचे स्वरूप समजावून घेणे.

५. बंजारा समाजातील धार्मिक स्थितीचा आढावा घेणे.

६. बंजारा समाजाच्या पारंपारिक व्यवसायाविषयी माहिती जाणून घेणे.

७. प्रामुख्याने दोन तालुक्यामध्ये बंजारा समाजाची असलेली लोकसंख्या अधिक असण्यामागील कारणे शोधणे

८. हिंगोली जिल्ह्यातील बजारा समाजाचा अभ्यास पूर्वसुरीने केला आहे तथापि तो मर्यादित स्वरूपाचा असल्याने व्यापकपणे मांडण्याचा प्रयत्न करणे.

४. संशोधनाची गृहीतके :

१. हिंगोली जिल्ह्यामधील सेनगाव व कळमनुरी येथे बजारा समाज बांधवांची संख्या उल्लेखनीय आहे.

२. बंजारा समाजाचे लमाणदेव ता. कळमनुरी व रेखेबाबा कापडसिंगी ता. सेनगाव येथे पवित्र शक्ती आहेत.

३. बंजारा समाजातील लोक संस्कृतीप्रिय असून आजतागायत त्याला चिटकून आहे. ४. बंजारा समाज हा कष्टाळू असून वाहतुकीची कामे करीत असे धान्य पुरवठा व युद्धजन्य परिस्थिती प्रसंगी राज्यकर्त्यांना दारुगोळा उपलब्ध करून देणे ही कामे करत असे.

५. बंजारा समाजाच्या अस्मितेपेक्षा अस्तित्ववाद अधिक मोठा आहे.

६. हिंगोली जिल्हा हा ऐतिहासिक दृष्टीकोनातून मोठी परंपरा लाभलेला जिल्हा आहे हे दिसून आले.

५. **संशोधनाची पद्धती:**

१. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीमध्ये वर्णनात्मक विशेषणात्मक नमुना निवड पद्धत व संदर्भग्रंथ पद्धतीचा आधार घेतला जाईल.

प्राथमिक साधने : प्राथमिक साधने अस्सल व समकालीन असल्यामुळे संशोधन वस्तुनिष्ठ आणि माहितीपर होते. मंदिरे, स्थापत्य मूर्ती आभूषणे, दीपमाळ हस्तलिखिते (पोच्या आणि संत चरित्र) नाणी, शाखे, भाडी, दुर्मिळ वस्तूच्या मदतीने अभ्यास करून त्याचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावला जाईल.

१. ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन निरीक्षणे नोंदविणे.

२. पुरातत्वीय साधनांचा अन्वयार्थ लावणे.

३. उपलब्ध पुराव्याचे विश्लेषण

४. प्रश्नावली पद्धतीच्या आधारे मौखिक इतिहास ही सशोधन पद्धती प्रत्यक्षात आणून विश्लेषण करणे.

मुलाखत पद्धतीचा अवलंब करून संशोधन कार्य सर्वसमावेशक करणे.

दुय्यम साधने : हिंगोली जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या अभ्यासाच्या दृष्टीकोनातून उपयुक्त अशा दुय्यम
संदर्भग्रंथ अभ्यासणे.

इतर साधने :

मौखिक परंपरा, दंतकथा, मुलाखती, पौराणिक संदर्भ स्थान महात्म्य ऐतिहासिक साधने विविध स्वरूपामध्ये उपलब्ध असून त्याचा आढावा घेणे. संदर्भग्रंथ, संशोधकांचे ग्रंथ, इतर संदर्भीय ग्रंथ, गॅझेटीयर, वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके इतिवृत्ते Use of Technical Sources-Internet, Website, E-Library, Computer Software's CD's Photography इत्यादीचा अभ्यास करून त्यांचे यथोचित संदर्भ घेऊन विश्लेषण करणे

६ संशोधन विषयाची आवश्यकताः

१. प्रस्तुत विषय अभ्यास निवडीतून बंजारासमाजामध्ये सकारात्मक बाजू भक्कम करावयाची की जेणेकरून त्याच्यातील न्यूनगड नाहीसा होईल.

२. बजारा समाजाचा सर्वांगीण अभ्यास करून इतिहासाविषयी त्यांना सजग करणे.

३. संस्कृती व रूढी परंपरा याची माहिती येणाऱ्या पीठीसमोर सक्षमपणे मांडता येईल.

४. हिंगोली जिल्ह्यात होऊन गेलेल्या संताची माहिती संपूर्ण समाजाला व्हावी जेणेकरून त्यांची तत्वे समाजातील सामान्य जनतेला अंगीकारता येईल.

५. हिंगोली जिल्ह्यातील बंजारा समाजातील निवडक स्वातंत्र्य सैनिकांचा अभ्यास करून त्यांच्या कार्याला उजेडात आणणे व त्याचा आदर्श समाजासमोर उभा करता येईल.

५. ज्या ज्या व्यक्तींना बंजारा समाजाचा इतिहास समजून घ्यावयाचे असेल त्यांना म्हणजे अभ्यासक व संशोधकास तो फलदायी ठरेल.

७. संशोधनाची व्याप्ती :

महाराष्ट्रातील वेगवेगळया भागात बजारा समाज राहतो पण त्या प्रत्येक भागाचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करता येणार नाही किंवा केला जाणार नाही ही या संशोधनासाठी मर्यादा राहील, परंतु असे असताना देखील हिंगोली जिल्ह्यामध्ये पाच तालुक्याचा समावेश असून बंजारा समाजाची लोकसंख्या उल्लेखनीय आहे. लमाणदेव ता. कळमनुरी व रेखाबा, कापडसिंगी ता सेनगाव ही येथील शक्तीस्थळे असून पंचक्रोशीतील प्रत्येक समाज बांधव वर्षांतून एकदा तरी दर्शनासाठी जातो अशा वेळी उपरोक्त शक्तीस्थळांचे स्थान महात्म्य जाणून घेणे व त्यानिमित्ताने होणारे सण व उत्सव यांचे स्वरूप जाणून घेऊन श्रद्धापूर्वक होत असलेल्या उत्सवामागील भूमिका जाणून घेणे. हिंगोलीच्या शेजारी असलेल्या नांदेड व वाशीम जिल्ह्यामध्ये समाज बांधवांची लोकसंख्या

खूप असताना त्यांचे अध्ययन करणे जिकरीचे बनते. संत सेवालाल यांची समाधी व अवतार कार्य हे वाशीम जिल्ह्यात असून प्रत्यक्ष तेथे जावून अध्ययन करणे अशक्यप्राय आहे. हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक समाज बांधावापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला जाईल, मुलाखत, सर्वेक्षण याच्या माध्यमातून नवनवीन माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

८. प्रकरण विभागणी

'हिंगोली जिल्हयातील बंजारा समाजाचा आर्थिक व सामाजिक जीवनाचा ऐतिहासिक अभ्यास'

- प्रकरण पहिले – विषय प्रवेश.
- प्रकरण दूसरे – हिंगोली जिल्हातील बंजारा समाजाची सामाजिक परिस्थिती.
- प्रकरण तिसरे – हिंगोली जिल्हयातील बंजारा समाजाची आर्थिक परिस्थिती.
- प्रकरण चौथे – हिंगोली जिल्हयातील बंजारा समाजाची सांस्कृतिक परिस्थिती.
- प्रकरण पाचवे – हिंगोली जिल्हयातील बंजारा समाजातील सामाजिक, धार्मिक व प्रबोधनकाराचा ऐतिहासिक अभ्यास.
- प्रकरण सहावे – निष्कर्ष व शिफारशी.

९. संदर्भ सूची

१. बंजारा लोकजीवन पद्धती डॉ. रुख्मीण पवार के. एस. अनकरे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद २००

२. बंजारा संस्कृती श्रीराम शर्मा मनोज शर्मा, दक्षिण प्रकाशन, हैद्राबाद, १९८३.

३. गोर बजारे लोकांचा इतिहास, बळीराम पाटील, सुधाकर नाईक, बळीराम पाटील स्मारक समिती प्रकाशन, यवतमाळ, १९६३.

४. बंजारा जाती आणि समाज संस्कृती, डॉ. यशवंत जाधव एम लोरा, वाणी प्रकाशन, दरियागज दिल्ली १९९०.

५. बंजारा नामावली साहित्य, सागर पब्लिकेशन, कानपूर.

६. स्वर्णीय बंजारा इतिहास, लेखक अशोक पवार, डॉ. सुनिता राठोड पवार.

७. Social Research G.A. Lundburg, Longmans Green B Company Publishing.

८. एक गुन्हेगार जमाती, प्रा. मोतीराम राठोड, मनोज प्रिंटर्स, औरंगाबाद.

९. Banjara Gypsy Puttappa Jadhav, M. Beval Trust Publication Bangalore.

१०. संशोधन पद्धती शाखे आणि तंत्रे डॉ. प्रदीप आगलावे, प्रमोद मुझे, विद्या प्रकाशन, नागपूर,

११. इतिहास लेखन शास्त्र समस्या- प्रा. प्रभाकर देव.

१२. Research Methodology- PL. Bhankarkar

संशोधक विद्यार्थी

यशदिप शंकरराव राठोड
(एम.ए. इतिहास)
तोष्णीवाल कला,वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय,सेनगांव
ता.सेनगांव जि.हिंगोली

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ.जी.पी.भालेराव